लोकसभेचा संग्राम
दैनिक
# महाराष्ट्र सम्राट
सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच !®
मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई, रायगड, पालघर आणि पुणे येथून प्रसिद्ध
संपादक : चंद्रकांत भोईटे

ई-पेपरसाठी नियमित पहा...
ePaper PDF
www.maharashtrasamrat.com

**तापमान**

कमाल ४१° से | किमान २८° से

**बाजार**

सोने ७१,०१० | चांदी ८१,८६०

**डोकं खाजवा** –अशोक सुतार

# आज चौथ्या टप्प्यासाठी अकरा मतदारसंघात मतदान

**अठराव्या लोकसभा निवडणुकांच्या चौथ्या टप्पासाठी उद्या मतदानाची रणधुमाळी पार पडणार आहे. एकूण पाच टप्प्यातील निवडणुकांपैकी राज्यात तीन टप्प्यातील मतदानाच्या रणधुमाळीची सांगता झालीय. तर उद्या, १३ मे रोजी राज्यातील उर्वरित ११ लोकसभा मतदारसंघातील चौथ्या टप्प्याच्या मतदानाची प्रक्रिया पार पडणार आहे. यात नंदुरबार, जळगाव, रावेर, जालना, छ.संभाजी नगर, मावळ, पुणे, शिरुर, अहमदनगर, शिर्डी आणि बीड या ११ मतदारसंघाचा समावेश आहे.**



या निवडणुकांच्या अनुषंगाने मतदान केंद्रावरील गैरसोयीचा परिणाम टक्केवारीवर होऊ नये म्हणून सर्व स्थरावरील प्रशासन सज्ज झाले आहे. तर मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी प्रशासनाने कसोशीचे प्रयत्न सुरू केले आहे. राज्यातील जिल्हा प्रशासनाने यापूर्वीच योग्य ती तयारी केली होती. मात्र, गेल्या ८ दिवसांपासून राज्यात कुठे वाढते ऊन, वातावरणातील वाढलेली आर्द्रता, तर कुठे अवकाळी पावसाचा तडाखा लक्षात घेता, काही विशेष काळजी घेतली जात आहे.

## मतदान प्रक्रिया गतिमान करण्यासाठी नव्या ॲप ची मदत

मतदान प्रक्रिया अधिक गतिमान करण्यासाठी छत्रपती संभाजीनगर जिल्हा प्रशासनानं एक ॲप डेव्हलप केलंय. पी एम एस २४ असं या पचे नाव आहे. मतदान केंद्रावर ईव्हीएम मध्ये बिघाड झाल्यास, अथवा कायदा आणि सुव्यवस्थेची परिस्थिती निर्माण झाल्यास, कुठली मेडिकल इमर्जन्सी निर्माण झाल्यास या ॲप वर क्लिक केल्यानंतर पोलीस आणि जिल्हा प्रशासनाला तात्काळ मतदान केंद्रावरील अडचण समोर येणार आहे. शिवाय प्रत्येक दोन तासाची आकडेवारी देखील जलद गतीने जिल्हा प्रशासनाला मिळेल. मात्र हे प केवळ छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यापूर्ते च मर्यादित असणार आहे.

## मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी प्रशासन सज्ज

शिर्डी लोकसभा तसेच दक्षिण नगर लोकसभेसाठी उद्या मतदान पार पडणार आहे. मतदानाचा टक्का वाढवण्यासाठी प्रशासनाने मिशन ७५ हाती घेतलय. शिर्डी लोकसभा मतदारसंघात अकोले, संगमनेर, शिर्डी, कोपरगाव, श्रीरामपुर आणि नेवासा या विधानसभा मतदारसंघाचा समावेश आहे. मतदारसंघात संपुर्ण निवडणूक प्रकिया निपक्ष: निर्भय, निकोप आणि भयमुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी प्रशासन सज्ज झालय.



# पवार, ठाकरे, अंधारे ते भुजबळ;

**महायुतीचे ठाण्यातील उमेदवार नरेश म्हस्के यांच्यासाठी जाहीर सभा**

# राज ठाकरे शिवसेनेच्या मंचावरुन कडाडले



## राज ठाकरेंकडून धर्मवीरांच्या आठवणींना उजाळा

श्रीकांत शिंदेंनी सांगितलं तसं फेव्हिकॉलचा जोड, पण पुढच्या वेळेला आतून लावा पण, नाही तर आमची बाजू बाहेरच. असं म्हणत त्यांनी खोचक टोला दिला. आनंद मठात गेलो, तेव्हा जुने दिवस आठवायला लागले. आनंद दिघे आणि माझे मैत्रिपूर्ण संबंध होते. तेव्हा त्यांना मी सांगायचो आश्रम स्वच्छ ठेवा. सर्वत्र अस्वच्छता असायची आणि ते त्यातच झोपायचे, आज लक्षात नाही आलं की, त्याच वास्तूत आलोय. तेव्हा आचारसंहिता वगैरे काही नव्हतं. रात्री १२-१ पर्यंत भाषणं चालायची. ठाणे टुमदार शहर होतं. तलाव बुजवलेत आणि टँकर सुरु झालेत. ३०-३५ वर्षांआधीचं असेल ते ठाणे, असं राज ठाकरे म्हणाले. आता काँक्रीट जंगलं उभी राहात आहेत, गेले अनेक वर्ष सांगतोय वेगवेगळ्या राज्यातून लोकं महाराष्ट्रात येतायत. बाहेरचे लोंढे थांबणार नाही, तोपर्यंत विकास होणार नाही. दोन्ही खासदारांनी कितीही फंड आणलेत, तर काही होऊ शकेल, असं राज ठाकरेंनी म्हटलं आहे.




**राजसाहेबांच्या भाषणातील सविस्तर मुद्दे** ....पान २ वर

■ शिवसेना, भाजपा, राष्ट्रवादी काँग्रेस, मनसे, रिपाइं व मित्र पक्षांच्या महायुतीचे शिवसेनेचे उमेदवार नरेश म्हस्के आणि कल्याण लोकसभा चे उमेदवार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या प्रचार सभेत मनसे अध्यक्ष राज ठाकरे ठाण्यातील टेंभी नाका येथील आनंद आश्रम नंतर ९० फिट रस्ता कळवा येथे सभाला संबोधित केली (छाया- मनोज सिंह)

**थोडक्यात घडामोडी**

## १४ मे रोजी ठाण्यात छत्रपती संभाजी महाराज जयंती निमित्त पहिल्यांदाच होणार शिवप्रदक्षिणा

ठाणे - छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त येत्या १४ मे रोजी ठाण्यातील तलावपाळी परिसरात ओबीसी प्रतिष्ठानच्या वतीने शिवप्रदक्षिणेचे आयोजन करण्यात आले आहे. स्वराज्याचे धाकले धनी अर्थात छत्रपती संभाजी महाराज यांची १४ मे रोजी जयंती आहे. ठाणे ओबीसी एकीकरण समिती, ओबीसी प्रतिष्ठानच्या वतीने ठाणे शहरातील मासुंदा तलाव, रंगो बापूजी गुप्ते चौक, चिंतामणी ज्वेलर्सच्या समोर छत्रपती संभाजी महाराज जयंती साजरी करण्यात येणार आहे. या जयंतीनिमित्त मासुंदा तलाव येथे अभिवादनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून सायंकाळी ६ वाजता मासुंदा तलाव परिसरात शिवप्रदक्षिणा करण्यात येणार आहे. या प्रदक्षिणेत संभाजी राजांच्या पुतळ्याची मिरवणूक काढण्यात येणार असून ढोल ,लेझीम पथकासह हजारो नागरिक सहभागी होणार असल्याचे ओबीसी प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रफुल वाघोले यांनी सांगितले.




# बहुजन विकास आघाडीचे राजेश पाटील यांचा मतदारांच्या प्रत्यक्षात संपर्कावर भर

वसई ( प्रतिनिधी ) बहुजन विकास आघाडीचे पालघर लोकसभा निवडणूक लढवीत असलेले उमेदवार राजेश रघुनाथ पाटील हे महाराष्ट्राचे विद्यमान आमदारही आहेत. आपल्या मतदारांच्या सतत संपर्कात राहिल्यामुळे ते मतदारांसाठी ओळखीचा चेहरा असलेले उमेदवार ठरले आहेत, त्यामुळे त्यांना आपल्या मतदारसंघातील कार्यकर्त्यांच्या आणि मतदारांच्या प्रत्यक्ष भेटी आणि त्यांच्या समस्या जाणून घेताना सहजपणे सुसंवाद घडत आहे. रविवार दिनांक १२ रोजी वसई पूर्व आणि पश्चिम भागातील कार्यकर्ते आणि मतदार यांच्या प्रत्यक्ष भेटी आणि मतदारांच्या समस्या जाणून घेताना त्यांचे कार्यकर्ते आणि मतदार आपल्या कोणत्याही समस्या न सांगता राजेश पाटील यांचे स्वागत करीत मनमोकळ्या चर्चा करीत त्यांना विजयासाठी शुभेच्छा देताना पहावयास मिळाले, याबाबत बहुजन विकास आघाडीच्या कार्यकर्त्यांना विचारले असता त्यांनी सांगितले की, बहुजन विकास आघाडीचे आमचे विद्यमान आमदार हितेंद्र ठाकूर, क्षितिज ठाकूर आणि राजेश पाटील हे जनतेच्या समस्या विधानसभेत तसेच मंत्री महोदयांकडे मांडून समस्या सोडविण्यावर नेहमीच भर देतात, बहुजन विकास आघाडीचे कार्यकर्तेही जनतेच्या नियमित संपर्कात असतात. यामुळेच बहुजन विकास आघाडीचे उमेदवार आमदार राजेश पाटील यांना मतदारांशी भेटीगाठी आणि प्रचार करताना कोणताही अडथळा येत नसून मतदारांशी मनमोकळी चर्चा होत आहे. तसेच विजयासाठी शुभेच्छा मिळत आहे. वसई पश्चिम येथील नवघर माणिकपूर आणि दिवाणमान येथे राजेश पाटील मतदारांना भेटण्यासाठी आले असता असता माजी महापौर नारायण मानकर यांनी आपल्या कार्यकर्त्यांसह त्यांचे जल्लोषात स्वागत केले. यावेळी बहुजन विकास आघाडीच्या हजारो कार्यकर्ते आणि मतदारांनी आपल्या उमेदवारास विजयासाठी शुभेच्छा दिल्या.

# १० वर्षे कृषी मंत्री असताना शरद पवारांनी ठाणे जिल्ह्याच्या शेतकऱ्यांसाठी काय केले ?

ठाणे - मला एकाने विचारले तुम्ही शेतकऱ्यांसाठी काय केले. तेव्हा मी त्याला सांगितले की, ते दहा वर्षे कृषी मंत्री होते. त्यांनी काय केले. राज्यात त्यांचेच सरकार होते. त्यांनी ठाणे जिल्हयासाठी काय केले. त्यावेळी त्यांनी ठाण्यातील शेतकऱ्यांसाठी काही केले असते असा सवाल भिवंडी लोकसभा मतदार संघातून निवडून लढविणारे महायुतीचे उमेदवार खासदार कपील पाटील यांनी राष्ट्रवादीचे नेते आणि माजी केंद्रीय कृषी मंत्री शरद पवार यांचा नामोल्लेख न करता उपस्थित केला आहे.



ठाणे, कल्याण आणि भिवंडी लोकसभा मतदार संघातील महायुतीचे उमेदवार यांच्या प्रचारार्थ कल्याण पश्चिमेतील व्हर्टेक्स मैदानात देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जाहिर सभेचे आयोजन १५ मे रोजी करण्यात आले आहे. या सभेची माहिती देताना खासदार पाटील यांनी उपरोक्त सवाल उपस्थित केला आहे खासदार पाटील यांनी सांगितले की, आज आपल्याला नाशिक पुण्यावरुन भाजीपाला येतो. दुध आपल्याला बाहेरुन येते. ते आपल्याला आणावे लागले नसते. ठाणे आणि मुंबईची लोकसंख्या ही राज्यातील एकूण लोकसंख्येच्या पैकी २५ टक्के आहे. या जिल्ह्यातील पैसे दुसऱ्या जिल्ह्यात जातात. त्याला लागणारे दूध हे नाशिख, धुळे, पुणे कोल्हापूर हून येते. इथे आपल्या गोव्या नाक्यावर मदर डेअरी आहे. मदर डेअरीत दूध बारामतीचे येतो. ही मदर डेअरी काढली. आत्महत्या शेतकऱ्यांकडून दूध घेऊन याठिकाणी विकायचे . हा निर्णय मी घेतलेला नाही.

## मुंबईसह ठाणे, कल्याण, भिवंडीत प्रचारसभांचा धडाडा

कल्याण-डोबिंवली : लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कल्याण डोंबिवलीतील राजकीय वातावरण तापू लागले आहे. येत्या २० मे रोजी मतदान होणार असून प्रचारासाठी अवघे ८ दिवस हातात आहेत. या पार्श्वभूमीवर येत्या आठवडाभरात कल्याण डोंबिवलीमध्ये महायुती आणि महाविकास आघाडीच्या दिग्गज नेत्यांच्या जाहीर सभांचा धुरळा उडणार आहे.

उद्या १२ मे रोजी रविवारी भिवंडी लोकसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीचे उमेदवार सुरेश उर्फ बाळ्या मामा म्हात्रे यांच्या प्रचारासाठी शरद पवार यांची कल्याण पश्चिमेतील यशवंतराव क्रीडांगण येथे संध्याकाळी ६ वाजता त्यांची जाहीर सभा होणार आहे. त्यापाठोपाठ सोमवारी १३ मे रोजी कल्याण लोकसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीच्या उमेदवार वैशाली दरेकर यांच्या प्रचारासाठी डोंबिवली पश्चिमेकडील भागशाळा मैदानात उद्धव ठाकरे यांची जाहीर सभा होणार आहे. तर ठाकरेंच्या सभेच्या एक दिवसानंतर म्हणजेच १४ मे रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची कल्याण पश्चिमेला जाहीर सभा होणार आहे. (पान २ वर)

**विजय निर्धार यात्रेचे मुरबाडमध्ये जोरदार स्वागत**

# चौथ्या दिवशीही अपक्ष उमेदवार निलेश सांबरे यांच्या प्रचाराचा झंझावात

**मुरबाड (प्रतिनिधी) : भिवंडी लोकसभा मतदारसंघातील जिजाऊ संघटनेचे अपक्ष उमेदवार निलेश सांबरे यांनी विजय निर्धार यात्रेच्या माध्यमातून मतदारसंघातील भिवंडी, वाडा, शहापूर, मुरबाड तालुक्यांचा ग्रामीण भाग प्रचाराच्या झंजावाताने पिंजून काढला आहे. मुरबाड तालुक्यातील मतदारांकडूनही सांबरे यांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. गावपाड्यात पोहोचून आपल्याला मतदान करण्याचे आवाहन सांबरे मतदारांना करीत आहेत.**

विजय निर्धार यात्रेने चौथ्या दिवशी (शनिवारी) मुरबाड तालुक्यात प्रवेश केला. यात्रेची सुरुवात मुरबाडमधील पवाळे गावातून झाली. यावेळी हजारो गावकऱ्यांनी गर्दी करीत सांबरे यांना पाठींबा दर्शविला. महिलाभगिनींनी सांबरे यांना ओवाळले. असंख्य लोक सांबरे यांच्याशी हस्तांदोलन करीत शुभेच्छा देत होते. मतदारांसह जिजाऊ संघटनेचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने यात्रेमध्ये सहभागी झाले होते.



महिलाही मोठ्या संख्येने प्रचारयात्रेत सहभागी होत होत्या. तेथून यात्रा पुढे निघाली. मार्गातील कोलठण, भादाने (सरळ गाव), सायलेफाटा, उमरोली (पिरोशी), टोकावडे, खापरी, शिरोशी, तळेगांव, न्याहाडी, मोरोशी-अवळेवाडी आदी गावांमध्ये विजय निर्धार यात्रेचे जोरदार स्वागत करण्यात आले. ठिकठिकाणी सांबरे यांच्यावर पुष्पवृष्टी करण्यात येत होती. फटाक्यांची



## शेंद्रून गावच्या महिलांनी केला गाण्यातून 'शिलाई मशीन'चा प्रचार

आतिषबाजी, ढोलताशांच्या गजरात सांबरे यांच्या विजयाच्या घोषणा कार्यकर्ते-नागरिक देत होते. सांबरे यांच्याशी हस्तांदोलन करण्यासाठी आबालवृद्ध पुढे येत होते. महिलावर्गाकडून सांबरे यांना औक्षण करून त्यांना विजयासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. जवळजवळ सर्व गावांमध्ये जिजाऊ संघटनेकडून विविध योजनांचा लाभ मिळालेले नागरिक पुढे येऊन निलेश सांबरें आणि जिजाऊ संस्थेचे आभार व्यक्त करताना दिसत आहेत. त्या सर्वांनीच सांबरे यांच्या मागे ठामपणे उभे असल्याचे सांगितले. (पान २ वर)

# संपादकीय...



## चित्रपट ताऱ्यांना निवडणुकीची लॉटरी

सध्या भाजपाने त्यांच्या निवडणूक जाहीरनाम्यात असलेले एक वचन पूर्ण केले आहे, ते म्हणजे राम मंदिर बांधणे. राम मंदिर बांधल्यानंतर भाजपाने खूप मोठी जाहिरात केली आहे. ही जाहिरात त्यांना लोकसभा निवडणुकीसाठी उपयोगी पडणार असे दिसते. तसेच भाजपाने आता रामायण मालिकेतील प्रमुख कलाकार अरुण गोविल म्हणजे रामाचे पात्र साकारणाऱ्या कलाकाराला लोकसभा निवडणुकीची उमेदवारी दिली आहे. यानिमित्ताने भाजपाच्या खात्यात अजून एक जागा निश्चित होईल असे दिसते. लोकसभा निवडणुकीसाठी भाजपाने अरुण गोविल यांना त्यांचे जन्मस्थान मेरठमधून नुकतीच उमेदवारी जाहीर केली आहे. मेरठ मतदारसंघ पश्चिम उत्तर प्रदेशमध्ये येतो. निवडणुकीच्या दृष्टीने पश्चिम उत्तर प्रदेश भाजपासाठी अत्यंत महत्त्वाचे क्षेत्र आहे.भारतीय जनता पक्षाने लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या उमेदवार यादीत काही सेलिब्रिटींना स्थान दिले आहे. यात बहुचर्चित रामायण मालिकेत प्रभू श्रीरामांची भूमिका साकारणारे अरुण गोविल यांच्या नावासह सिनेअभिनेत्री कंगना रणौतच्या नावाचा समावेश आहे. चार दशकांपूर्वी प्रदर्शित झालेली रामायण मालिका देशभर गाजली होती. तेव्हा लोक या मालिकेत प्रभू श्रीरामाची भूमिका साकारणारे अरुण गोविल यांची पूजा करायचे. याच मालिकेतून अरुण गोविल घराघरात पोहोचले. रामायण मालिका खूप वर्षांपूर्वी दूरदर्शनवर दाखविण्यात आली होती. परंतु या मालिकेचे गारुड अजूनही कमी झालेले नाही. या मालिकेच्या निमित्ताने भाजपा अरुण गोविल यांना निवडणुकीत उतरवत आहे असे दिसते.

गोविल हे आता शक्यतो चित्रपटांपासून दूर आहेत. रामायण मालिकेमध्ये काम करून ते खुश होते. परंतु लोकसभा निवडणूक जवळ येतात भाजपाने त्यांच्या जनमानसातील प्रतिमेचा राजकीय लाभ घेण्याचे ठरवले आहे. त्यानुसार अरुण गोविल यांना मेरठमधून उमेदवारी देण्यात आली आहे. लोकसभा निवडणुकीसाठी भाजपाने गोविल यांना त्यांचे जन्मस्थान मेरठमधून उमेदवारी जाहीर केली. मेरठ मतदारसंघ हा उत्तर प्रदेशमधील असून निवडणुकीच्या दृष्टीने पश्चिम उत्तर प्रदेश भाजपासाठी अत्यंत महत्त्वाचे क्षेत्र आहे. या क्षेत्रात राज्यातील ८० पैकी १९ जागा आहेत. २००९ पासून सलग तीन वेळा मेरठमधून विजयी झालेले विद्यमान खासदार राजेंद्र अग्रवाल यांना डावलून भाजपाने गोविल यांना तिकीट दिले आहे. भाजपचा यावर्षी लोकसभा निवडणुकीतील मुद्दा राम मंदिर असा असून त्यानिमित्ताने रामायण मालिकेत महत्त्वाचे पात्र साकारणाऱ्या अरुण गोविंद यांना उमेदवारी दिली आहे. भाजपा लोकसभा निवडणुकीत आपली एक जागा निश्चित करीत असल्याचे दिसते. परंतु त्याचवेळी मेरठमधून तीन वेळा जिंकलेले खासदार यांना भाजपाने डावले आहे. त्यामुळे भाजपची अशी राजकीय चाल आहे की, जो सद्यस्थितीत लोकसभा निवडणुकीसाठी योग्य वाटतो तोच उमेदवार भाजपाने दिला आहे. यावरून असे दिसते की, भाजपा आपल्याला राजकीय लाभ होईल अशा प्रकारचा उमेदवार दरवेळी निकडणुकीत देत असतो. त्यात पक्षनिष्ठेला स्थान नसते असेही दिसते

२०१९ च्या लोकसभा निवडणुकीत, विद्यमान खासदार राजेंद्र अग्रवाल यांनी बहुजन समाज पक्षा (बसपा) चे हाजी याकूब कुरेशी यांचा ४,७२९ मतांच्या फरकाने पराभव केला होता. परंतु, २०१४ च्या निवडणुकीत त्यांनी बसपाच्या मोहम्मद शाहिद अखलाक यांचा २.३२ लाखांपेक्षा जास्त मतांनी पराभव केला होता. आगामी निवडणुकांसाठी, भाजपाने जयंत चौधरी यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोक दल (आरएलडी) बरोबर जागावाटप करार केला आहे. आरएलडी पश्चिम उत्तर प्रदेशमधील महत्त्वाचा पक्ष आहे. गेल्या महिन्यात आरएलडीने भाजपाच्या नेतृत्वाखालील एनडीएमध्ये जाण्यासाठी इंडिया आघाडी सोडली होती. भाजपाने पश्चिम उत्तर प्रदेशमधील बागपत आणि बिजनौर या दोन जागा आरएलडीला दिल्या आहेत.

अरुण गोविल यांनी प्रभू रामचंद्रांचे पात्र साकारल्यानंतर लोकांच्या मनात त्यांची एक वेगळी प्रतिमा निर्माण झाली. असे असले तरी गोविल यांनी चित्रपटांमध्ये अनेक भूमिका साकारल्या. त्यांनी शालेय नाट्यगृह सुरू केले. मेरठच्या शासकीय आंतर महाविद्यालयातील नाटक मंडळाचेही ते सदस्य होते. १९७० च्या दशकाच्या मध्यात मुंबईतील राजश्री प्रॉडक्शनने त्यांना पहेली (१९७७) चित्रपटाची ऑफर दिली. काही वर्षांनंतर राजश्री प्रॉडक्शनने गोविल मुख्य भूमिकेत असलेले तीन चित्रपट प्रदर्शित केले होते. सावन को आने दो चित्रपटात त्यांनी जरीना वहाबने साकारलेल्या चंद्रमुखी या पात्राच्या प्रेमात पडलेल्या एका तरुण ग्रामीण गायकाची भूमिका साकारली. साँच को आंच नहीं मध्ये गोविल आणि मधु कपूर यांना तरुण प्रेमी युगलांच्या रूपात दाखवण्यात आले होते, ज्यांना त्यांच्या कुटुंबातील संघर्षाचा सामना करावा लागला. हे दोन्ही चित्रपट हिट ठरले. परंतु, त्यांचा तिसरा चित्रपट और सीता फार कमाई करू शकला नाही. अरुण गोविल यांना लोकसभा निवडणूक २०२४ मध्ये उतरवण्याचा भाजपचा एकच उद्देश आहे, तो म्हणजे आपल्या जागांमध्ये वाढ करणे. कारण अरुण गोविल यांची जादू अजूनही जनमानसात आहे. त्याचा राजकीय फायदा भाजप घेऊ इच्छितो.

# नरेश म्हस्के यांच्या विजयासाठी रणनीती तयार – लोकनेते आमदार गणेश नाईक

नवी मुंबई - गेले दोन दिवस नवी मुंबईमध्ये ठाणे लोकसभा महायुतीचे शिवसेनेचे उमेदवार नरेश म्हस्के यांच्या विजयासाठी प्रचार दौरे सुरु असून सर्व माजी नगरसेवक, पदाधिकाऱ्यांनी त्यांचे जोरदार स्वागत केले आहे. कार्यकर्त्यांच्या चेहऱ्यावर उत्साहाचे वातावरण आहे. नरेश म्हस्के यांना विजयी करायचे, हेच टार्गेट आणि स्टॅटेजी असल्याची माहिती लोकनेते आमदार गणेश नाईक दिली.नरेश म्हस्के यांच्या निवडणूक प्रचारार्थ आज नवी मुंबई येथे भारतीय जनता पार्टीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांची बैठक आयोजित करण्यात आली. बैठकीनंतर प्रसिध्दी माध्यमांशी बोलतांना गणेश नाईक यांनी वरील प्रतिक्रिया दिली.



बैठकीला माजी खासदार डॉ. संजिव नाईक, माजी आमदार संदीप नाईक, माजी आमदार रवींद्र फाटक, माजी महापौर सागर नाईक, युवा सेना कार्याध्यक्ष पूर्वेश सरनाईक, युवा नेते वैभव नाईक, गणेश म्हात्रे, रामचंद्र घरत, महिला उपाध्यक्ष वर्षा भोसले, बेलापूर निवडणूक प्रमुख निलेश म्हात्रे, भाजपाचे सर्व उपाध्यक्ष, सचिव, सहचिटणीस, शक्ती केंद्र, प्रकोष्ठ, वॉरियर्स, सुपरवॉरियर्स, प्रभाग, वॉर्ड, बुथ प्रमुख, माजी नगरसेवक उपस्थित होते. भारत माता की जय, फिर एक बार मोदी सरकार, अबकी बार ४०० पार च्या घोषणा सभागृहात देण्यात आल्या. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना तिसऱ्यांदा पंतप्रधान करण्याकरता ऋअबकी बार, ४०० पार', ऋबार बार, मोदी सरकार' हा निर्धार महायुतीच्या सर्व पक्षांनी केला आहे. त्या अनुषंगाने नरेश म्हस्के यांना उमेदवारी दिली आहे. आज नवी मुंबईतील भाजपाचा कार्यकर्ता सर्वार्थीने कामाला लागल्याचे गणेश नाईक यांनी सांगितले. भविष्यामध्ये येणाऱ्या सर्व चांगल्या गोष्टी घडण्याकरता ही महायुती मजबूत राहिली पाहिजे. म्हणून नरेश म्हस्के यांचे निवडून जाणे महत्वाचे आहे. त्यासाठी प्रत्येकाने कामाला लागावे, असे आवाहन गणेश नाईक यांनी केले. नाईक कुटुंबिय गेले दोन दिवस प्रचारात पूर्ण ताकदीने उतरले आहे. नगरसेवक, पदाधिकारी रस्त्यावर उतरले आहेत. अबकी बार ४०० पार करण्याकरता सगळे काम करत आहेत. १४० करोड जनतेचा एकमेव उमेदवार आहेत ते म्हणजे नरेंद्र मोदी. या निवडणुकीत मोठ्या मताधिक्याने विजय मिळवणार असल्याचे नरेश म्हस्के यांनी सांगितले.

## पवार, ठाकरे, अंधारे ते भुजबळ;

### महायुतीचे ठाण्यातील उमेदवार नरेश म्हस्के यांच्यासाठी जाहीर सभा

# राज ठाकरे शिवसेनेच्या मंचावरून कडाडले

**ठाणे : महाराष्ट्रात फोडाफोडीच्या राजकारणाची सुरुवात शरद पवारांनी केली, काँग्रेस फोडली, छगन भुजबळांना पाठवून बाळासाहेबांची शिवसेना फोडली, असं म्हणत राज ठाकरे यांनी शरद पवार यांच्यावर जोरदार निशाणा साधला आहे. उद्धव ठाकरेंनी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे सात पैकी सहा नगरसेवक खोके-खोके देऊन फोडले, असा आरोप करत राज ठाकरेंनी उद्धव ठाकरेंनाही लक्ष्य केलं आहे. ठाणे लोकसभा मतदारसंघातील प्रचार सभेत राज ठाकरेंनी उद्धव ठाकरे यांच्यासह शरद पवारांवरही परखड टीका केली आहे.**




■ **उद्धव ठाकरेंनी खोके देऊन मनसेचे नगरसेवक फोडले** – राज ठाकरे यांनी उद्धव ठाकरेंवर टीका करताना म्हटलं की, फोडाफोडीचं राजकारण मला कधी मान्य झालं नाही आणि कधी होणारही नाही, पण या सगळ्यात जे आज बोलतायत आमचा पक्ष फोडला, आमचा पक्ष फोडला, तुम्ही जे बसलेले आहाता, कुठच्या तरी आघाडी, जरा एकमेकांकडे एकदा बघा, आपण काय उद्योग केलेत ते. याचं उद्धव ठाकरेंनी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे सात पैकी सहा नगरसेवक खोके-खोके देऊन फोडले होतेत ना, तेव्हा काही नाही वाटलं. अहो, मागितले असते, तर दिले असते. पण काय आहे, ते म्हणतात ना, ढेकणासंगे हिराही भंगला. बरोबर शरद पवार बसलेत.

■ **महाराष्ट्रात पवारांकडून फोडाफोडीच्या राजकारणाची सुरुवात** – शरद पवारांनाही राज ठाकरेंनी या सभेतून हल्लाबोल केला आहे. यावेळी राज ठाकरे म्हणाले की, फोडाफोडीच्या राजकारणाची महाराष्ट्रात कुणी सुरुवात केली असेल, तर ती शरद पवारांनी केली. पहिल्यांदा काँग्रेस फोडली त्यांनी आणि मग पुलोद म्हणून स्थापन केलं. ७७-७८ साली पुलोद स्थापन केलं. पहिल्यांदा महाराष्ट्रामध्ये अशा प्रकारचं फोडाफोडीचं राजकारण सुरु झालं, ते शरद पवारांनी या गोष्टीची सुरुवात केली.

■ **माझा बाहेरून पाठिंबा आहे, मी काहीही बोलू शकतो** – १९९१ पुन्हा याचं शरद पवारांनी छगन भुजबळांना फितवून बाळासाहेबांची शिवसेना फोडायला लावली. त्यावेळी शिवसेनेचे आमदार फोडण्याचं काम शरद पवारांनी केलं. ज्या छगन भुजबळांना फोडलं आज ते इथे असतील. मी काय माझा बाहेरून पाठिंबा आहे, मी काहीही बोलू शकतो. आपल्याला थोडी फेव्हिकॉल अजून लागलाय. त्याच्यानंतर नारायण राणे यांच्यासोबत आमदार घेऊन काँग्रेसने पुन्हा बाळासाहेबांची शिवसेना फोडली. मला आजचं नेतृत्व तेव्हा कुठे टाहो फोडताना दिसलं नव्हतं, असं म्हणत राज ठाकरेंनी उद्धव ठाकरेंवर टीकास्त्र डागलं आहे.

■ **राज ठाकरेंच्या भाषणाचे मुद्दे** – आनंद आश्रमात गेलो तेव्हा जुने दिवस आठवले, आनंद दिघे आणि माझे मैत्रिपूर्ण संबंध होते. रात्री १२-१ पर्यंत भाषणं चालायची, तेव्हा आचारसंहिता नव्हती. मोठे स्टेज नव्हते. तलावांचं ठाणे टुमदार शहर होतं, आता तलाव बुजवलेत आणि टँकर सुरु झाले आहेत, हे त्याकाळचं नाही, तर अगदी ३०-३५ वर्षांआधीचं ठाणे असेल, आता काँक्रीट जंगलं उभी राहात आहेत, असं म्हणत त्यांनी ठाणे आणि आनंद दिघे यांच्यासह बाळासाहेबांच्या आठवणींना उजाळा दिला आहे.

■ **राज ठाकरेंनी दाखवला सुषमा अंधारेंचा 'तो' व्हिडीओ** – सुषमा अंधारेंच्या अनेक क्लिप्स आहेत, मला काही देणं-घेणं नाही. म्हाताऱ्याच्या हातात थरथर करणारा हात, असं वक्तव्य करणाऱ्या व्यक्तीला प्रवक्ता करता आणि आपल्या वडिलांवर प्रेम आहे असं सांगता. छगन भुजबळांबरोबर मांडीला मांडी लावून बसता, तेव्हा वाटलं नाही. कसलं फोडाफोडीचं राजकारण म्हणतायत तुम्ही? मी बाळासाहेबांना सांगून बाहेर पडलो. मी त्यांना मिठी मारली आणि म्हटलो येतो मी. बाळासाहेब ठाकरे सोडून कोणाच्याही हाताखाली काम करणार नाही. पक्षाचे चढउतार आलेत तर, मार्ग काढीन त्यातून, असं राज ठाकरे यांनी यावेळी नमूद केलं आहे.

■ **सुषमा अंधारेंच्या भाषणाचा व्हिडीओ राज ठाकरेंनी दाखवला** – राज ठाकरे यांनी लावा रे तो व्हिडीओ म्हणत दाखवलेल्या व्हिडीओमध्ये सुषमा अंधारे यांच्या भाषणाचा जुना व्हिडीओ दाखवण्यात आला. या भाषणात सुषमा अंधारे यांनी म्हटलं होतं की, ''वय झालेल्या बाळासाहेब ठाकरेंच्या हातात म्हणजे, या ८०-८५ माणसाच्या हातात तलवार देऊन काय उपयोग होणार आहे, हात थरथर करायला लागले आहेत, अन् हातात, तलवाल मग तरणीबांड पोरं काय गोट्या खेळायला गेली आहेत का, याच्यावर अग्रलेख कधी लिहिणार.'' असं म्हणत सुषमा अंधारे यांनी बाळासाहेबांवर टीका केली होती. त्यावरुन राज ठाकरेंनी सभेतून उद्धव ठाकरेंवर हल्ला चढवला.

■ **अडीच-अडीच वर्षाचं बोलणं बंद खोलीत** – सिंपथी मिळाली सुरु होतं मात्र, दोन वर्षांच्या आधीचा काळ काढून बघा. मधातच टुम काढली अडीच-अडीच वर्षाचं बोलणं झालं बंद खोलीत. आमचा मुख्यमंत्री देवेंद्र असणार, असं नरेंद्र मोदी आणि शाह बोलले, तेव्हा नाही बोललात. मला हल्ली कळतंच नाही, कोण कोणासोबत आहेत. सांगण्याचं कारण एवढंच की, २०१९ नंतर गोंधळ उडाला, तो तुमच्या महत्त्वकांक्षेपाई, असं म्हणत त्यांनी उद्धव ठाकरेंवर टीका केली आहे.

■ **मला आजही मोदींचे काही मुद्दे पटत नाहीत** – हो मी नरेंद्र मोदींना विरोध केला, चांगलं केलं तर बोललो. आज मोदींविरोधात जे बोलतायत, जर समजा २०१९ साली मान्य केलं असतं, अडीच वर्ष तुमची, तर केली असती टीका. मला आजही मोदींचे काही मुद्दे पटत नाहीत. देशात चांगल्या मुस्लिमांना दंगे नको असतात. पुण्यात फतवे काढले गेले ना, शिवसेना उबाठा, कांग्रेसला मतदान करावं, का? तर वाहियातपणा करायला मिळाला नाही. या देशाच्या सुरक्षेचा प्रश्न आहे.

■ **मुंब्र्यातील ६ दहशतवाद्यांना अटक** – नरेश म्हस्के आणि श्रीकांत शिंदे हे तुमच्यासाठी आणलंय, हे फक्त एका मुंब्र्यातलं आहे. मुंब्र्यातील ६ दहशतवाद्यांना अटक झाली. २००२ साली हिजबुलच्या आंतकवाद्याला अटक, इशरत जहां पण मुंब्र्यात अटक, लष्कर ए तोएबाच्या दहशतवाद्याला अटक, पॉप्युलर फ्रांटच्या कार्यकर्त्यांना अटक, पॅलेस्टाईनच्या समर्थकांना अटक, मुंब्रा कसं दहशतवाद्यांचे अजेंडा बनत आहे, यावर सामनात अग्रलेख देखील लिहिला होता, आता नाही लिहिणार, असं म्हणत त्यांनी वाढत्या दहशतवादाकडे लक्ष वेधलं आहे.

■ **चांगला मुसलमान यात भरडायला नको** – कोण तुमची रिक्षा चालवत आहे, बाजूनं जातंय सुरक्षेचा विषयच नाही. १० वर्षात डोकं वर काढलं तर, चेचले जाऊ, त्यामुळे हे पाठिंब्याचं सुरुय. चांगला मुसलमान यात भरडला जाणार नाही, याची देखील दक्षता घेतली पाहिजे. विकासाबरोबर सुरक्षा देखील महत्त्वाचा विषय आहे, असंही राज ठाकरे म्हणाले.



# रासायनिक खते, बियाणे, विक्रेते, उत्पादक व गुणनियंत्रण निरीक्षक यांची खरीप हंगाम पूर्व आढावा सभा संपन्न

ठाणे जिल्ह्यातील सन २०२४ मधील खरीप हंगाम पूर्व आढावा सभा जिल्हा परिषदेच्या सभागृहात दि. ७ मे रोजी पार पडली. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी दिपक कुटे यांनी खते व बियाणे विक्रेत्यांनी कायदेशीर तरतुदींना अधिन राहून व्यवसाय करावा असे स्पष्ट केले. बोगस बियाणे, खते व औषधे विक्री करताना कोणी आढळल्यास त्यांच्याविरूध्द कडक कारवाई करण्यात येईल असा इशारा दिला. क्षेत्रिय कर्मचाऱ्याच्या मार्फत रँडमली शेतकऱ्यांनी खरेदी केलेल्या खतांचे तपासणी करुन माहिती घ्यावी व पावत्यांना न देता विक्री करणाऱ्या विक्रेते व व्यक्तीविरुध्द सदरील खते बोगस आहेत असे समजून पोलीस कारवाई करणेत येईल. सर्व विक्री केंद्रांची हंगामपूर्व १००% तपासणी करण्याच्या सूचना जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी सर्व क्षेत्रिय अधिकाऱ्यांना दिल्या.

खरीप २०२४ हंगामात खताची टंचाई भासणार नाही व शेतकऱ्यांना गुणवत्तापूर्वक खते रास्त दरात मिळतील या संदर्भात सर्वतोपरी काळजी घेण्याबाबत सर्व उपस्थितांना सांगितले. खरीप हंगाम सुरळीत जावा याकरिता सर्व यंत्रणांनी एकत्रित काम करावे असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी दिपक कुटे यांनी केले.

ठाणे जिल्हा परिषदेचे कृषि विकास अधिकारी रामेश्वर पाचे यांनी ठाणे जिल्ह्यासाठी १०,००० मे.टन रासायनिक खतांचे आवंटन मंजूर झाल्याचे सांगितले. रासायनिक खतांचे शेतकऱ्यांना विक्री करतांना पॉस मशिनद्वारेच करावी. खत वाटप होत असताना शेतकऱ्यांना लिंकिंगच्या समस्येला तोंड देण्याच्या तक्रारी प्राप्त होतात, त्याकरिता अशा प्रकारच्या तक्रारीची गंभीर दखल घेण्यात येईल व खताबरोबर इतर अनावश्यक निविष्ठा शेतकऱ्यांना सक्तीने विकल्या जाणार नाहीत याबद्दल सर्व वितरकांना सक्त सूचना दिल्या. अन्यथा विक्रेत्यांविरूध्द कडक कारवाई करण्यात येईल असा इशारा दिला. जिल्ह्यामध्ये नॅनो युरिया व नॅनो डिएपी प्रभावीपणे वापराचे प्रोत्साहन देण्यासाठी विस्तार योजनाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना प्रोत्साहित करावे व त्याचा वापर वाढविण्याकरिता भर देण्यात यावा अशा सूचना सर्व क्षेत्रिय अधिकारी व उपस्थितांना दिल्या.

## मुंबईसह ठाणे, कल्याण, भिवंडीत प्रचारसभांचा धडाडा

(पान १ वरून) भिवंडी लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार कपिल पाटील आणि कल्याण लोकसभा मतदारसंघातील उमेदवार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या प्रचारासाठी पंतप्रधान मोदी यांची सभा होत आहे. या तिन्ही दिग्गज नेत्यांच्या जाहीर सभांमुळे काळात कल्याण डोंबिवलीतील राजकीय वातावरणही चांगलेच ढवळून निघणार आहे.

## चौथ्या दिवशीही अपक्ष उमेदवार निलेश सांबरे यांच्या प्रचाराचा झंझावात

(पान १ वरून) विजय निर्धार यात्रेने पुढे वैशाखरे, पेंढरी, पळू, सोनावळे, दहि गांव, धसई, खेवारे महाज, मिल्हे, खोपिवली, देहरी, नारीवली, म्हसा, मुरबाड, धानीवली या गावांमधून किशोर गावाकडे प्रस्थान केले. या प्रचार दौऱ्यात मुरबाडच्या ग्रामीण भागातील गावपाड्यात पोहोचून आपल्याला मतदान करण्याचे आवाहन सांबरे यांनी मतदारांना केले.

**गाण्यातून 'शिलाई मशीन'चा प्रचार** – शहापूरच्या शेंद्रून गावच्या महिला भगिनींनी एक सुदर गीत गात त्या गीतातून त्यांनी भिवंडी लोकसभेचे अपक्ष उमेदवार निलेश सांबरे यांची निवडणूक निशाणी असलेल्या 'शिलाई मशीन'चे बटन दाबून त्यांना विजयी करण्याचा संदेश मतदारांना दिला आहे. सांबरे यांनी जिजाऊ संघटनेच्या माध्यमातून महिलांच्या सक्षमीकरणासाठी केलेल्या प्रचंड कामाने महिलाभगिनीमध्येही ते प्रचंड लोकप्रिय असल्याचे या घटनेतून दिसून येत आहे. भिवंडी लोकसभेचे अपक्ष उमेदवार निलेश सांबरे यांची विजय निर्धार यात्रा दिवसभर प्रचार करून मुक्कामासाठी शुक्रवारी रात्री १२ च्या सुमारास शहापूरच्या शेंद्रून गावात पोहोचली होती. त्यावेळी मोठ्या संख्येने निलेश सांबरे यांना भेटण्यासाठी सर्व गावकरी गोळा झाले. त्यावेळी मोठ्या संख्येने आलेल्या महिलाभगिनींनी एक सुदर गीत गायले. या गीतातून त्यांनी सांबरे यांची निवडणूक निशाणी 'शिलाई मशीन'चे बटन दाबून त्यांना विजयी करण्याचा संदेश मतदारांना दिला आहे. याप्रसंगी निलेश सांबरे त्यांच्या गाण्याची स्तुती केली. 'रात्री उशिरापर्यंत थांबून आपण या भावावरील प्रेमासाठी सुंदर गीत सादर केले.

हे प्रेम प्रत्येकाच्या नशिबात नसते. आजपर्यंत असे कधीच झाले नाही की, एका अपक्ष उमेदवाराला जिंकून आणण्यासाठी संपूर्ण समाज बांधव मैदानात उतरला आहे. विजय आपलाच आहे,' अशा शब्दात सांबरे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. तद्नंतर शेंद्रूण गावातीलच आई गावदेवी मातेचा पालखी सोहोळ्याला दर्शनासाठी सांबरे सहकाऱ्यांसह पोहोचले. रात्री एक वाजण्याच्या सुमारास सोहोळ्यात सहभागी होत निलेश सांबरे यांनी देवीची पालखी खांद्यावर घेत देवीचा जयघोष केला.


**प्रपत्र सी — १**

**फौजदारी प्रकरणांबाबतचे घोषणापत्र**

उमेदवाराचे नाव व पत्ता : **नरेश गणपत म्हस्के**
२०७ आनंद नगर, शिवसेना शाखेजवळ, कोपरी, ठाणे

राजकीय पक्षाचे नाव : **शिवसेना**

निवडणुकीचे नाव : **लोकसभा सार्वत्रिक निवडणूक — २०२४**

मतदारसंघाचे नाव : **२५ — ठाणे लोकसभा**

मी, **नरेश गणपत म्हस्के** वर नमूद केलेल्या निवडणुकीचा उमेदवार असून, माझ्या फौजदारी पूर्व चरित्रबद्दलचा पुढील तपशील जनतेच्या माहितीसाठी घोषित करीत आहे :-

| अ.क्र. | (अ) प्रलंबित फौजदारी प्रकरणे | | |
|---|---|---|---|
| | न्यायालयाचे नाव | प्रकरण क्रमांक व दिनांक | प्रकरणाची सद्यस्थिती संबंधित अधिनियमांचे कलम (अधिनियमांची कलमे) आणि अपराधाचे (अपराधांचे) थोडक्यात वर्णन |
| १ | ४७१/२०२०, सीजेएम. कोर्ट, ठाणे | ४७१ / २०२० ३५३, १४३, १४७, १४८, १४९, ४५२, ४२७ | सार्वजनिक सेवकाला त्याचे कर्तव्य पार पाडण्यापासून रोखण्यासाठी बळाचा वापर, बेकायदेशीर सभा, दंगल इ. |
| २ | ३०१६३७ / २०१५ | आयपीसी 188, मुंबई पोलीस कायदा ३७ (३), १३५ | लोक सेवकाने योग्यरित्या जाहीर केलेल्या आदेशाची अवज्ञा |

| ( ब ) फौजदारी अपराधांसाठी दोषसिद्ध ठरविलेल्या प्रकरणांचा तपशील | | | जास्तीत जास्त ठोठावलेली शिक्षा |
|---|---|---|---|
| अ.क्र. | न्यायालयाचे नाव व आदेशाचा (आदेशांचे) दिनांक | अपराधाचे (अपराधांचे) वर्णन व ठोठावलेली शिक्षा | |
| १ | निरंक | निरंक | निरंक |
| २ | निरंक | निरंक | निरंक |

नाव व स्वाक्षरी
**नरेश गणपत म्हस्के**

## महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी लि.

- जागा : ५३४७
- पदाचे नाव: विद्युत सहाय्यक
- शैक्षणिक पात्रता: (i) १०+२ बंधातील माध्यमिक शालांत परीक्षा (१०वी) (ii) ITI (विजतंत्री/तारतंत्री (Electrician / Wireman) किंवा महाराष्ट्र राज्य व्यवसाय परीक्षा मंडळ यांनी प्रमाणित केलेले ०२ वर्षांचा पदविका (Electrician / Wireman) अभ्यासक्रम प्रमाणपत्र.
- वयाची अट: २९ डिसेंबर २०२३ रोजी १८ ते २७ वर्षे मागासवर्गीय/आ.दु.घ.: ०५ वर्षे सूट
- वय गणकयंत्र: वय मोजा
- नोकरी ठिकाण: संपूर्ण महाराष्ट्र
- फी : खुला प्रवर्ग: २५०/- मागासवर्गीय/आ.दु.घ./अनाथ: १२५/-
- अर्ज करण्याची शेवटची तारीख: २० मे २०२४
- अधिकृत वेबसाईट: https://www.mahadiscom.in/

## हिंदुस्थान उर्वरक आणि रसायन लिमिटेड

- जागा : ८०

१ मॅनेजर / (L2)
२ इंजिनिअर/ (L-1)
३ ऑफिसर/ (L-1)
४ चीफ मॅनेजर/ (L-3)
५ असिस्टंट मॅनेजर/(L1) FTC
६ ऑफिसर/(L1) FTC

- शैक्षणिक पात्रता:

पद क्र.१: (i) ६०% गुणांसह इंजिनिरिंग पदवी/B.Sc. (-gri)+ M.Sc./CA/CMA (ii) १२ वर्षे अनुभव
पद क्र.२: (i) ६०% गुणांसह इंजिनिरिंग पदवी (ii) ०२ वर्षे अनुभव
पद क्र.३: (i) ६०% गुणांसह इंजिनिरिंग पदवी/ MBA/CA/CMA (ii) ०२ वर्षे अनुभव
पद क्र.४: (i) CA/CMA/ PGDM²/ MBA (Finance) (ii) १९ वर्षे अनुभव
पद क्र.५: (i) ६०% गुणांसह पदवी/PG डिप्लोमा (Communication/ -dvertising Communication Management/Public Relations/ Mass Communication/ Journalism) किंवा MBA/MSW किंवा B.Sc. (Agri)+ M.Sc.(Agriculture) किंवा BSc.Agri/B.Tech+ MBA/PGDBM² (ii) ०७ वर्षे अनुभव
पद क्र.६: (i) LLB (ii) ०५ वर्षे अनुभव

- वयाची अट: २० मे २०२४ रोजी, SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट

पद क्र.१: ४० वर्षांपर्यंत
पद क्र.२: ३० वर्षांपर्यंत
पद क्र.३: ३० वर्षांपर्यंत
पद क्र.४: ४७ वर्षांपर्यंत
पद क्र.५: ४५ वर्षांपर्यंत
पद क्र.६: ३५ वर्षांपर्यंत

- वय गणकयंत्र: वय मोजा
- नोकरी ठिकाण: संपूर्ण भारत
- फी : फी नाही.
- अर्ज करण्याची शेवटची तारीख: २० मे २०२४
- अधिकृत वेबसाईट: https://hurl.net.in/

### २५ ठाणे लोकसभा निवडणुकीसाठी लागणारी

# मतदान यंत्रे सीलबंद करण्याची प्रक्रिया सुरू

ठाणे : लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यात ठाणे जिल्ह्यात २० मे २०२४ रोजी मतदान होणार असून यासाठी संपूर्ण प्रशासकीय यंत्रणा तयारी तरत आहे. २५ ठाणे लोकसभा मतदारसंघातील सहा विधानसभा मतदारसंघातील मतदान केंद्रावर लागणाऱ्या ईव्हीएम, कंट्रोल युनिट, बी.यू.युनिट, व्ही.व्ही. पॅट मशीन्स सीलबंद करण्याची प्रक्रिया आजपासून सुरू झाली. तसेच मतदान केंद्रावर नियुक्त करण्यात आलेल्या अधिकारी, कर्मचारी यांचे दुसरे प्रशिक्षणही आज राम गणेश गडकरी रंगायतन व डॉ. काशिनाथ घाणेकर सभागृह येथे पार पडले.

२५ ठाणे लोकसभा मतदारसंघातील १४८ ठाणे विधानसभा मतदारसंघात मतदान केंद्रावर लागणाऱ्या ईव्हीएम, कंट्रोल युनिट, बी.यू युनिट, व्ही.व्ही पॅट सील करण्याची प्रक्रिया आज जोशी बेडेकर महाविद्यालयात पार पडली. २५ ठाणे लोकसभा मतदारसंघाच्या १४८ ठाणे मतदारसंघात एकूण ३६१ मतदान केंद्रे असून या मतदान केंद्रावर लागणारे बॅलेट युनिट, कंट्रोल युनिट, व्ही.ही पॅट मशीन्स सील करण्याची प्रक्रिया आज करण्यात आली. यावेळी केंद्रीय निवडणूक निरीक्षक जे.श्यामला राव, २५ ठाणे लोकसभा मतदारसंघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी मनिषा जायभाये- धुळे, १४८ ठाणे विधानसभा मतदारसंघाच्या सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी उर्मिला पाटील, अप्पर तहसीलदार आसावरी संसारे उपस्थित होत्या. सदरची प्रक्रिया ही उमेदवारांच्या राजकीय प्रतिनिंधीसमक्ष पार पडली.



उद्या दिनांक १३ मे २०२४ रोजी २५ ठाणे लोकसभा मतदारसंघाअंतर्गत १४६ ओवळा माजिवडा विधानसभा मतदारसंघात मतदान केंद्रावर लागणाऱ्या ईव्हीएम, कंट्रोल युनिट, बी.यू युनिट, व्ही.व्ही पॅट मशीनची सीलबंद करण्याची प्रक्रिया येथे तर १४७ कोपरी पाचपाखाडी विधानसभा मतदारसंघातील मतदान केंद्रावर लागणाऱ्या मशीन्सची सीलबंद प्रक्रिया १३ ते १५ मे २०२४ पर्यत चालणार आहे. १४९ कळवा- मुंब्रा विधानसभा मतदारसंघातील मतदान केंद्रावर लागणाऱ्या मशीन्सची सीलबंद करण्याची प्रक्रिया १३ व १४ मे २०२४ या दोन दिवशी सुरू राहणार आहे. १५० ऐरोली विधानसभा व १५१ बेलापूर विधानसभा मतदारसंघातील मतदान केंद्रावर लागणाऱ्या मशीन्स सीलबंद करण्याचे काम १३ व १४ मे या दोन दिवशी होणार आहे.

मतदान केंद्रावर नियुक्त करण्यात आलेल्या अधिकारी,कर्मचारी यांचे दुसरे प्रशिक्षण राम गणेश गडकरी रंगायतन व डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृह येथे दोन सत्रात पार पडले. २५ ठाणे लोकसभा मतदारसंघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी मनिषा जायभाये- धुळे यांनी सर्व ठिकाणी भेट देवून सुरू असलेल्या कामाचा आढावा घेतला.

## आर्ममेंट रिसर्च डेव्हलपमेंट एस्टॅब्लिशमेंट

- जागा : २०
- ज्युनियर रिसर्च फेलो
- रिसर्च असोसिएट
- शैक्षणिक पात्रता:

पद क्र.१: प्रथम श्रेणी BE/B. Tech+NET/GATE किंवा प्रथम श्रेणी M.Sc+NET
पद क्र.२: (i) PhD (ii) ME/M.Tech (iii) ०३ वर्षे अनुभव
वयाची अट: २८ वर्षांपर्यंत SC/ST: ०५ वर्षे सूट, OBC: ०३ वर्षे सूट

- वय गणकयंत्र: वय मोजा
- नोकरी ठिकाण: पुणे
- : फी नाही.
- अर्ज पाठविण्याचा पत्ता: The Director, Armament Research Development Establishment (ARDE), Armament Post, Pashan, Pune-411021
- अर्ज पोहचण्याची शेवटची तारीख: ३१ मे २०२४
- अधिकृत वेबसाईट: https://www.drdo.gov.in/drdo/labs-and-establishments/armament-research-development-establishment-arde



# तुम्ही कांदा आणि लसूण खाणे सोडून दिल्यास तुमच्या शरीरावर काय परिणाम होणार?

तुमच्यापैकी बरेच लोक कांदा, लसूण खातात. कांदा-लसूण प्रत्येकाच्या आहारात महत्त्वाचा घटक असतो. दररोज या पदार्थांचे सेवन केले जाते. अनेकांना तर त्याच्याशिवाय खाण्याचा आनंद घेता नाही. पण तुम्हाला माहीत आहे का, अनेक जण कांदा-लसूण खाणे टाळतात. शाकाहारातल्या जैन आणि वैष्णव प्रकारच्या जेवणात कांदा आणि लसूण खात नाहीत. इतरही बर्याच घरांत विशेषतः कोणत्याही गणपती, चातुर्मास अशा धार्मिक काळात केलेल्या स्वयंपाकातही कांदा आणि लसूण वापरत नाहीत. आयुर्वेदामध्ये व प्राचीन भारतीय औषध पद्धतींत कांदे आणि लसूण हे अनुक्रमे राजसिक आणि तामसिक पदार्थ मानले जातात, जे उत्कटता व आक्रमकता वाढवतात आणि आळशीपणा आणतात. पण, जर कांदा व लसूण खाल्ले नाहीत, तर तुमच्या शरीरावर काय परिणाम होऊ शकतो, या विषयावर आहारतज्ज्ञ कनिक्का मल्होत्रा यांनी माहिती दिल्याचे वृत्त द इंडियन एक्स्प्रेसने दिले आहे. सविस्तर माहिती आपण जाणून घेऊ.

आहारतज्ज्ञ सांगतात, कांदे आणि लसणामध्ये सल्फरयुक्त रासायनिक संयुगे असतात; ज्यांना फ्रक्टन्स व डिसल्फाइड म्हणतात. ही संयुगे अन्ननलिकेच्या अस्तरासाठी त्रासदायक ठरू शकतात. विशेषत: ज्यांना छातीत जळजळ किंवा ॲसिड रिफ्लक्स होण्याची शक्यता असते. या दोन्ही गोष्टींना आहारातून काढून टाकल्याने काहींच्या छातीत जळजळ होऊ शकते. तर दुसरीकडे काही लोक कांदे आणि लसूण यांच्याबद्दल अतिसंवेदनशील असू शकतात; ज्यामुळे ते खाल्ल्यानंतर त्यांना मळमळ, अतिसार किंवा पोटात पेटके यांसारखे अस्वस्थता निर्माण करणारे त्रास होतात. त्यांना हे पदार्थ वर्ज्य केल्याने या परिस्थितीत आराम मिळू शकतो.

तुमच्या आहारामध्ये कांदे आणि लसूण समाविष्ट आहेत. हे कार्बोहायड्रेट्स आहेत, जसे की साखर आणि फायबर; जे काही लोकांसाठी लहान आतड्यांद्वारे शोषले जात नाहीत. त्यांचे जास्त प्रमाणात सेवन केल्याने तुम्हाला संवेदनशील ॠख ट्रॅक्ट किंवा इरिटेबल बोवेल सिंड्रोम आणि ॲसिड रिफ्लक्स यांसारख्या परिस्थितींना सामोरे जावे लागू शकते; ज्यामुळे गॅस, गोळा येणे, अतिसार व बद्धकोष्ठता होऊ शकते.

लसूण आणि कांदा तामसिक जेवणाच्या श्रेणीत आहे. हे पदार्थ गरम मानले जातात. असे म्हटले जाते की, हे पदार्थ खाल्ल्याने ब्लड सर्क्युलेशन कमी-जास्त होते. अशा स्थितीत राग, एक्साइटमेंट्, आळस जास्त येतो. म्हणून पावसाळ्यात हे पदार्थ न खाण्याचा सल्ला दिला जातो. तसेच हे लक्षात ठेवणे महत्त्वाचे आहे की, कांदे आणि लसणामध्ये अँटिऑक्सिडंट्स आणि लिसिनचे प्रमाण जास्त असते. हे एक अँटिऑक्सिडंट आहे; ज्यामध्ये रक्तदाब आणि कोलेस्ट्रॉल कमी होणे यांसारखे संभाव्य आरोग्य फायदे आहेत. त्यामुळे ते तुमच्या आहारातून वर्ज्य केल्याने फायदेशीर संयुगे कमीही होऊ शकतात.

# ‘मुंबई लोकल’ चित्रपटाचे पोस्टर लॉन्च

मुंबईकरांची लाईफलाईन म्हणून मुंबई लोकलची ओळख आहे. ही मुंबई लोकल दररोज लाखो प्रवाशांची ने-आण करते. दररोज लाखो चाकरमानी या लोकलने प्रवास करतात. याच मुंबई लोकलवर आता एक नवा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. ‘मुंबई लोकल’ असं चित्रपटाचं नाव आहे. चित्रपटाच्या कथानकात प्रवासा दरम्यान लोकलमध्ये घडणारे मनोरंजक किस्से चित्रपटात पाहायला मिळणार आहे.

अभिनेता प्रथमेश परब आणि अभिनेत्री ज्ञानदा रामतीर्थकर पहिल्यांदाच एकत्र आले आहेत. मुंबई लोकल या चित्रपटात प्रथमेश आणि ज्ञानदाची जोडी दिसणार असून, या नव्या जोडीविषयी चित्रपटसृष्टीत उत्सुकता निर्माण झाली आहे. अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर चित्रपटाच्या टीमने सिद्धिविनायक चरणी दर्शन घेऊन या चित्रपटाची घोषणा केली.

टाइमपास, टकाटक, बालक पालक अशा अनेक चित्रपटांतून अभिनेता प्रथमेश परबनं आपल्या अभिनयाचं नाणं खणखणीत वाजवलं आहे. विनोदी भूमिकांसह त्याच्यातील गंभीर अभिनेत्याचं दर्शन प्रेक्षकांना घडवलं आहे. त्यामुळे प्रथमेश परब हा नव्या पिढीतला लोकप्रिय अभिनेता ठरला आहे. तर ज्ञानदा रामतीर्थकरनं प्रामुख्यानं टीव्ही मालिकांमध्ये अभिनय केला आहे.








ज्ञानदाच्या सख्या रे, जिंदगी नॉट आऊट, शतदा प्रेम करावे, ठिपक्यांची रांगोळी अशा मालिका गाजल्या आहेत. त्याशिवाय धुरळासारखे काही चित्रपटही तिनं केले आहेत.

बिग ब्रेन प्रॉडक्शन्सचे निलेश राठी यांनी मुंबई लोकल या चित्रपटाची निर्मिती केली आहे. प्राची राऊत, सचिन अगरवाल सहनिर्माते असलेल्या या चित्रपटाचं दिग्दर्शन अभिजित करणार आहेत. या चित्रपटात प्रथमेश परब आणि ज्ञानदा रामतीर्थकर ही जोडी पहिल्यांदाच एकत्र आली असून मनमीत पेम, पृथ्वीक प्रताप, वनिता खरात, अभिजीत चव्हाण, अनिकेत केळकर, संजय खापरे, संजय कुलकर्णी, स्मिता डोंगरे आदी कलाकारही आपल्याला या चित्रपटातून भेटीस येणार आहेत. चित्रपटाचे छायांकन योगेश कोळी करणार असून संकलन स्वप्निल जाधव यांचे आहे. क्रिएटिव्ह प्रोड्यूसर आणि सह दिग्दर्शक विनोद शिंदे असून कलादिग्दर्शक म्हणून सुमित पाटील पाहणार आहेत. कार्यकारी निर्माता नीलेश गुंडाळे तर रश्मी राठी कपडेपट पाहणार आहेत. संगीतकार म्हणून देव आशिष आणि हर्षवर्धन वावरे काम पाहत आहेत. मुंबईची जीवनवाहिनी असलेल्या लोकल रेल्वेमध्ये घडणारी एक मनोरंजक कहाणी या चित्रपटात मांडण्यात आली आहे.

## प्लेऑफमध्ये पोहोचणारा केकेआर ठरला पहिला संघ...



# गोलंदाजांच्या जोरावर कोलकाताने केला मुंबईचा पराभव

नवी दिल्ली : फिरकीपटू वरुण चक्रवर्तीच्या नेतृत्वाखालील गोलंदाजांनी केलेल्या शानदार कामगिरीच्या जोरावर कोलकाता नाईट रायडर्सने शनिवारी (११ मे) पावसाने व्यत्यय आणलेल्या सामन्यात मुंबई इंडियन्सचा १८ धावांनी पराभव केला. या विजयासह श्रेयस अय्यरच्या नेतृत्वाखालील संघ आयपीएलच्या चालू हंगामात प्लेऑफमध्ये पोहोचणारा पहिला संघ ठरला आहे. केकेआरने मुंबईला विजयासाठी १६ षटकांत १५८ धावांचे लक्ष्य ठेवले होते, मात्र मुंबई संघाला निर्धारित १६ षटकांत आठ गड्यांच्या मोबदल्यात १३९ धावाच करता आल्या.

पावसामुळे सामना दोन तास १५ मिनिटे उशिराने सुरू झाला. पावसाने सामन्यात व्यत्यय आणल्याने सामना १६-१६ षटकाचा असा करण्याचा निर्णय घेण्यात आला. या सामन्यात मुंबईने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. केकेआर संघाने १६ षटकांत सात गडी गमावून १५७ धावा केल्या. केकेआरसाठी व्यंकटेश अय्यरने २१ चेंडूंत सहा चौकार आणि दोन षटकारांच्या मदतीने सर्वाधिक ४२ धावा केल्या. मुंबईसाठी वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह आणि अनुभवी फिरकी गोलंदाज अमित मिश्राने प्रत्येकी दोन बळी घेतले.

मुंबईने लक्ष्याचा पाठलाग करताना प्रभावी खेळाडू म्हणून आलेल्या रोहित शर्मा आणि इशान किशन या सलामीच्या जोडीने दमदार सुरुवात केली. या दोन्ही फलंदाजांनी पॉवरप्लेपर्यंत कोणतेही नुकसान न करता ६२ धावा केल्या होत्या. मात्र, अनुभवी फिरकीपटू सुनील नरेनने सातव्या षटकातील पाचव्या चेंडूवर इशानला बाद करून केकेआरला पहिले यश मिळवून दिले. इशान २२ चेंडूंत पाच चौकार आणि दोन षटकारांच्या मदतीने ४० धावा करून बाद झाला.

इशान बाद झाल्यानंतर मुंबईचा डाव फसला आणि पुढच्याच षटकात वरुण चक्रवर्तीने रोहितला बाद करून मुंबईला दुसरा धक्का दिला. रोहित २४ चेंडूत १ चौकार आणि १ षटकाराच्या मदतीने १९ धावा करून बाद झाला. यानंतर सूर्यकुमार यादवही अपेक्षित कामगिरी करून शकला नाही आणि आंद्रे रसेलच्या चेंडूवर मोठा फटका खेळताना त्याने आपली विकेट गमावली. सूर्यकुमार यादव १४ चेंडूत एका चौकाराच्या मदतीने ११ धावा करून बाद झाला. या धक्क्यातून मुंबईचा संघ सावरण्यापूर्वीच वरुण चक्रवर्तीने कर्णधार हार्दिक पांड्याला (०२) आणि आंद्रे रसेलने खाते न उघडता टीम डेव्हिडला बाद करून मुंबईला अडचणीत आणले.

विकेटची पडझड होत असताना तिलक वर्माने हर्षित राणाच्या षटकात फटकेबाजी केली आणि तुफानी खेळी खेळली. १५ वे षटक टाकण्यासाठी आलेल्या हर्षितच्या षटकातून तिलकने १६ धावा काढल्या. तिलकने या षटकात एक षटकार आणि दोन चौकार मारले. मात्र, दुसऱ्या टोकाला धाव घेण्याच्या प्रयत्नात नेहल वढेरा धावबाद झाला. तीन चेंडूत तीन धावा करून वढेरा बाद झाला. यानंतर नमन धीर सहा चेंडूत १७ धावा करून बाद झाला. शेवटच्या षटकाच्या पहिल्या चेंडूवर हर्षित राणाने नमन धीरला बाद केले. त्यानंतर तिलक वर्माही हर्षितचे बळी ठरला. तिलक वर्मा याने १७ चेंडूत ३२ धावांची खेळी केली. १५८ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना मुंबईने एके काळी ५ षटकांत एकही विकेट न गमावता ५९ धावा केल्या होत्या, मात्र त्यानंतर केकेआरच्या फिरकीपटूंनी धावांचा वेग रोखून नियमित अंतराने विकेट्स घेतल्या. आणि मुंबई संघाला निर्धारित १६ षटकांत आठ गड्यांच्या मोबदल्यात १३९ धावाच करता आल्या. केकेआरकडून हर्षित राणा, वरुण चक्रवर्ती आणि आंद्रे रसेलने प्रत्येकी दोन बळी घेतले.

दरम्यान, केकेआरचा १२ सामन्यांमधला हा नववा विजय आहे आणि ते १८ गुणांसह गुणतालिकेत अव्वल स्थानावर आहे. कोलकातानंतर राजस्थानचा संघ आहे ज्याचे ११ सामन्यांत १६ गुण आहेत. रविवारी राजस्थानचा सामना चेन्नई सुपर किंग्जशी (उडघ) होणार आहे. जर राजस्थान हा सामना जिंकण्यात यशस्वी ठरला तर प्लेऑफमध्ये पोहोचणारा घघठ नंतरचा दुसरा संघ ठरेल. दुसरीकडे, मुंबईचा १३ सामन्यांमधला हा नववा पराभव असून गुणतालिकेत ते नवव्या स्थानावर आहेत. मुंबईचा संघ आधीच प्लेऑफच्या शर्यतीतून बाहेर पडला आहे.

नियुक्ती



*हिंदूहृदयसम्राट वंदनीय शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या आशिर्वादाने व शिवसेना मुख्यनेते एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार आणि खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या सुचनेनुसार माधुरी काळे यांची उपजिल्हा संघटक - कल्याण पूर्व या पदी आजपासून एक वर्षाकरीता नियुक्ती करण्यात आली आहे.*

## पूर्व परिक्षेकरिता सुपरवायझर राहिलेल्या शिक्षक, शासकीय कर्मचाऱ्यांना

# पोस्टल मतदानापासून वंचित ठेवू नये

### संजय घाडीगावकर यांची निवडणूक आयोगाकडे मागणी

ठाणे : एप्रिल २०२४ मध्ये व्यावसायिक पूर्व परिक्षे करिता सुपरवायझर राहिलेल्या शिक्षक, शासकीय कर्मचारी यांना पोस्टल बॅलेट पासून वंचित ठेवू नये अशा आशयाची मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उपजिल्हाप्रमुख संजय घाडीगावकर यांनी राज्य निवडणूक आयोगाकडे पत्राद्वारे केली आहे.
राज्य निवडणूक आयोगाला दिलेल्या पत्रात संजय घाडीगावकर यांनी म्हटले आहे की, एप्रिल २०२४ महिन्यात शासनाने व्यावसायिक शिक्षणासाठी ज्या पूर्व परीक्षा आयोजित केलेल्या होत्या, त्या पूर्व परीक्षांना काही शिक्षक, शासकीय कर्मचारीवर्ग सुपरवायझर म्हणून त्यांचे कर्तव्य बजावत होते.परिणामी त्यांना एप्रिल २०२४ मध्ये पोस्टल बॅलेट करिता फॉर्म भरून देता आले नाहीत. त्या दिवशीचे निवडणूक प्रक्रियेचे ट्रेनिंगही त्यांना घेता आले नाही. म्हणून अशा शिक्षकांना आणि शासकीय कर्मचाऱ्यांना आपण नोटिसा, मेमो बजावले होते .त्यांनी या नोटिसा आणि मेमोंना लेखी उत्तर दिल्यानंतर आपणास वस्तुस्थिती अवगत झालेली असतानाही असे शिक्षक आणि शासकीय कर्मचारी यांना पोस्टल वोटिंग पासून आपण वंचित ठेवत आहात ही बाब योग्य नाही याकडे ठाकरेंच्या शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख संजय घाडीगावकर यांनी निवडणूक आयोगाचे लक्ष वेधले आहे.
सदरची बाब ही अति गंभीर असून कोणत्याही व्यक्तीला त्याचे मतदानाचे राष्ट्रीय कर्तव्य बजावण्यापासून वंचित ठेवणे हे नक्कीच लोकशाहीला धोकादायक आहे. लोकशाहीच्या या उत्सवात निवडणूक आयोगाकडून या प्रकारे कृत्य घडणे ही बाब लोकशाहीसाठी अत्यंत घातक आणि मारक आहे. माझी आपणास विनंती आहे की ज्या लोकांना ज्या शासकीय कर्मचारी तथा शिक्षकांना पोस्टल वोटिंग साठी वंचित राहावं लागलेला आहे त्यांना निवडणूक निर्णय अधिकारी तथा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या मार्फत तातडीने संपर्क साधून postal मतदान करण्यासाठी योग्य ती कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी संजय घाडीगावकर यांनी या पत्रात

## जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांचे प्रतिपादन

### मतदान जनजागृतीसाठी ठाण्यात 'रन फॉर वोट' या मिनी मॅरेथॉनचे आयोजन

# युवकांनी मतदानाचे राष्ट्रीय कर्तव्य पार पाडावे

■ ठाणे (मेधा भोईटे) : लोकसभा निवडणुकांमध्ये मतदानाचा टक्का वाढावा व जास्तीत जास्त नागरिकांनी मतदान करावे यासाठी ठाणे शहरात आयोजित केलेल्या 'रन फॉर व्होट' या मिनी मॅरेथॉनला ठाणेकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. युवकांनी मोठ्या संख्येने निवडणुक प्रक्रियेत सहभागी होवून राष्ट्रीय कर्तव्य पार पाडण्यासाठी मतदान करावे असा संदेश ठाणे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे या मॅरेथॉनमध्ये सहभागी झालेल्या तरुणांना दिला.







ठाणे जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे महापालिका, ठाणे जिल्हा ॲथलेटिक असोसिएशन आणि ठाणे सिटीझन्स फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'रन फॉर व्होट' या मिनी मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृह येथील मुख्य रस्त्यावर ही मॅरेथॉन स्पर्धा पार पडली. सदर मॅरेथॉन स्पर्धेस ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्यासह महापालिकेचे अधिकारी उपस्थित होते. यावेळी जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी या मॅरेथॉन स्पर्धेला झेंडा दाखवून सुरूवात केली.
प्रत्येक सज्ञान नागरिकाला भारतीय संविधानाने मतदान करण्याचा समान हक्क प्रदान केलेला आहे. प्रत्येकाने येत्या २० मे रोजी लोकसभा निवडणुकीसाठी मतदान करावे असे आवाहन ठामपा सौरव राव यांनी उपस्थित मतदारांना केले.
रन फॉर वोट' या मिनी मॅरेथॉन स्पर्धेत २५ ठाणे-लोकसभा मतदार संघअंतर्गत, १४८ ठाणे विधानसभा मतदारसंघ सहा. निवडणूक निर्णय अधिकारी श्रीमती

**पालिका आयुक्त सौरभ राव यांच्यासह पालिकेचे अन्य अधिकारी उपस्थित**

उर्मिला पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली स्वीप पथक कर्मचाऱ्यांनी धावपटू मतदारासोबत सहभागी होऊन मतदानाबाबत जनजागृती केली. तसेच स्वीपच्या पथकाने धावपटूंना मतदानाची शपथ दिली. मी मतदान करणारंच... आपण ही मतदानासाठी सज्ज रहा या आशयाचा मजकूर असलेले व त्यावर मतदान दिनांक २० मे २०२४ असलेले माहितीपत्रकाचे वाटपही उपस्थित धावपटू मतदार व नागरीकांना करण्यात आले. या मिनी मॅरेथॉन स्पर्धेस धावपटूंचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी ठिकठिकाणी उभारण्यात आलेल्या सेल्फी पॉईटवर तरुणांनी सेल्फी काढून मतदार जनजागृतीच्या घोषणा दिल्या.
लोकशाहीच्या उत्सवात मतदानाच्या दिवशी देशाच्या भविष्यासाठी मतदानाचा हक्क बजावून लोकशाही बळकट करावी आणि सर्वांनी न चुकता दिनांक २० मे २०२४ रोजी अवश्य मतदान करावे असे आवाहन रन फॉर वोट' मिनी मॅरेथॉन मध्ये सहभागी असलेल्या सर्व नागरिकांना १४८ विधानसभा मतदारसंघ स्वीप पथक मार्फत करण्यात आले.

## मतदानासाठी २० मे रोजी भर पगारी सुट्टी

### जिल्हा निवडणूक अधिकारी अशोक शिनगारे यांचे आदेश

ठाणे : लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी ठाणे जिल्ह्यात सोमवार दिनांक २० मे २०२४ रोजी मतदान होणार आहे. प्रत्येक मतदाराला मतदान करता यावे यासाठी लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ च्या कलम १३५ ब नुसार भरपगारी रजा देय असल्याचे आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अशोक शिनगारे यांनी दिले आहेत.
ठाणे जिल्ह्यात २३-भिवंडी, २४-कल्याण आणि २५-ठाणे लोकसभा मतदार संघ आहेत. या तीनही मतदारसंघात पाचव्या टप्प्यात सोमवार २० मे २०२४ रोजी मतदान होणार आहे. या मतदारसंघांच्या मतदार यादीत समाविष्ट असलेल्या प्रत्येक मतदाराला मतदान करता यावे, यासाठी अशा सर्व मतदारांना लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१ च्या कलम १३५ ब नुसार भरपगारी रजा देय आहे.

### आदेशाचे पालन न करणाऱ्या आस्थापनावर कारवाई

जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी जिल्ह्यातील सर्व आस्थापना प्रमुखांना त्यांच्या अधिपत्याखालील सर्व अधिकारी /कर्मचारी/रोजंदारी कर्मचारी यांना सोमवार दि.२० मे २०२४ रोजी भरपगारी रजा मंजूर करण्याचे आदेश शर्ती/अटीस अधीन राहून देय आहे. या आदेश हा शासकीय आस्थापना/खासगी आस्थापना/ रोजंदारीवरील कर्मचारी आस्थापना/दुकाने/कंपनी/अशा सर्व आस्थापनांना लागू आहे. ज्या आस्थापनांमध्ये उक्त कामगारांचे अनुपस्थितीमुळे उक्त आस्थापनांना धोका निर्माण होऊ शकतो अथवा मोठ्या प्रमाणात तोटा होऊ शकतो अशा कर्मचाऱ्यांसाठी लागू नाही. या आदेशाचे पालन न करणाऱ्या आस्थापना प्रमुख हे उक्त कलमाचे १३५ ब (२) नुसार कारवाईस पात्र राहतील. सदर आदेश हा अन्य जिल्ह्यात काम करणाऱ्या परंतु ठाणे जिल्ह्याच्या क्षेत्रातील मतदार यादीत नाव असलेल्या मतदारांच्या आस्थापना प्रमुखांनाही लागू होत आहे, असेही आदेशात म्हटले आहे.

### ठाणे शहरात शाहू मार्केट परिसरात

## नाका कामगारांमध्ये मतदान जनजागृती






■ ठाणे

**लोकशाही बळकटीकरणामध्ये मतदारांचा सक्रिय सहभाग असणे अत्यंत आवश्यक असून प्रत्येक मतदाराने मतदान करावे, यासाठी २५ ठाणे-लोकसभा मतदार संघअंतर्गत,१४८ ठाणे विधानसभा मतदारसंघ सहा.निवडणूक निर्णय अधिकारी श्रीमती.उर्मिला पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शाहू मार्केट नौपाडा परिसरात नाका कामगारा सोबत मतदान जनजागृतीपर कार्यक्रम घेण्यात आला. या वेळी परिसरातील कामगारांनी मतदान करुन आपला हक्क बजवावा, मतदान करावे, असे आवाहन करण्यात आले.**

मतदार राजा जागा हो, लोकशाहीचा धागा हो. आणि २० मे को सब काम छोडो मतदान करो अशा घोषणा देत मतदान करण्याची प्रतिज्ञा घेण्यात आली. कोणत्याही मतदाराला त्यांच्या मतदानाच्या लोकशाही अधिकारापासून वंचित ठेवता कामा नये आणि त्यामुळे मतदानाचा दिवस सर्वांसाठी सुट्टी म्हणून जाहीर करण्यात आला आहे, लोकशाहीच्या उत्सवात मतदानाच्या दिवशी आपली सर्व कामे बाजूला ठेवून उज्वल भविष्यासाठी मतदानाचा हक्क बजावून लोकशाही बळकट करावी आणि सर्वांनी न चुकता दिनांक २० मे २०२४ रोजी अवश्य मतदान करावे असे आवहान सर्व उपस्थित कामगारांना सहायक प्रकल्प अधिकारी तानाजी सोनवलकर यांनी केले. सदर मतदान जनजगृती कार्यक्रमात सहभागी असणाऱ्या नाका कामगारांना मी मतदान करणारंच..... आपण ही आपल्या मतदानासाठी सज्ज रहा. या आशयाचे मजकूर असलेले व त्यावर मतदान दिनांक २० मे २०२४ असे दर्शवणारे माहितीपत्रकाचे ही वाटप करण्यात आले.

## ठाणे जिल्ह्यात गृहमतदानाला सुरुवात

### ८५ वर्षावरील ६३४ तर, १०३ दिव्यांग नागरिकांनी बजावला मतदानाचा हक्क

ठाणे : दिव्यांग आणि ८५ वर्षावरील नागरिकांना मतदानाचा हक्क बजावता यावा आणि मतदानाचा टक्का वाढावा यासाठी भारत निवडणूक आयोगामार्फत गृह मतदानाची सुविधा उपलब्ध केली आहे. ज्या ज्येष्ठ आणि दिव्यांग व्यक्तींना आजारपणामुळे घराबाहेर पडता येत नाही, अशा व्यक्तींसाठी ही सुविधा असणार आहे. त्यानुसार, ठाणे जिल्ह्यात ८५ वर्षावरील ६३४ आणि १०३ दिव्यांग नागरिकांनी मतदानाचा हक्क बजावला. मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी तसेच ८५ वर्षावरील नागरिकांना आणि दिव्यांग असलेल्या व्यक्तींना घर बसल्या मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी भारत निवडणूक आयोगामार्फत प्रथमच गृह मतदानाची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. त्यानुसार, ठाणे जिल्ह्यात या प्रक्रियेला ९ मे पासून सुरुवात झाली असून विधानसभा मतदारसंघ निहाय्य ही मतदान प्रक्रिया पार पडत आहे. ठाणे लोकसभा मतदारसंघ आणि भिवंडी लोकसभा मतदार संघामध्ये ९ मे रोजी तर, कल्याण लोकसभा मतदार संघा मध्ये १० मे रोजी गृह मतदान प्रक्रिया पार पडली. त्यानुसार, ठाणे लोकसभा मतदार संघात ८५ वर्षावरील २५६ आणि दिव्यांग ३७ तर, कल्याण लोकसभा मतदार संघात ८५ वर्षावरील २१५ आणि दिव्यांग ४४ आणि भिवंडी लोकसभा मतदार संघात १६३ आणि दिव्यांग २२ असे गृह मतदान पार पडले. यातही, काही नागरिक घरी उपलब्ध नसल्यामुळे त्यांचे मतदान अद्याप बाकी आहे.

## कल्याण मोमीस समूहाने बाईक रॅलीच्या माध्यमातून केली मतदान जनजागृती

■ ठाणे

कल्याण पश्चिम मतदारसंघात कल्याण मोमीस समूहातर्फे मतदार जनजागृतीकरिता बाईक रॅली काढण्यात आली होती. या बाईक रॅलीत नागरिक उत्स्फूर्तपणे सहभागी झाले होते. आम्ही नक्की मतदान करणार असा संदेश या बाईक रॅलीच्या माध्यमातून नागरिकांना देण्यात आला. सज्ञान झालात.. पण सुजाण झालात का.., वेड मतदान करण्याचे.., २० मे रोजी नक्की मतदान करा असा संदेश देणारे फलक हातात घेवून मतदानाचा टक्का वाढविण्याबाबत नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणावर जनजागृती करण्यात आली.
अठरावं वरीस मोक्याचं.. असा संदेश देत नवमतदारांनाही मतदान करण्याबाबत आवाहन करण्यात आले. वसंत व्हॅली, खडकपाडा सर्कल, साई चौकपर्यत सदर रॅली काढण्यात आली. लोकसभा निवडणुकीतील मतदानाचा टक्का वाढावा यासाठी स्वीपच्या माध्यमातून विविध जनजागृतीपर उपक्रम राबविले जात आहेत.
१३८ कल्याण मतदार संघातील स्वीप नोडल प्रमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सदरची बाईक रॅली काढण्यात आली. २० मे रोजी नक्की मतदान करा... अशा घोषणा देत या रॅलीत कल्याण मोमीस समूहाचे सदस्य देखील मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.




# कल्याण लोकससभा मतदारसंघातील निवडणूक कर्तव्यावरील अधिकारी/कर्मचाऱ्यांनी केले टपाली मतदान

**ठाणे (गणेश भोईटे) : निवडणूक कर्तव्यावर असलेले परंतु ज्यांचे मतदान कार्यक्षेत्राबाहेर असलेल्या शासकीय अधिकारी कर्मचारी यांच्यासाठी आज टपाली मतदानाची सुविधा २४ कल्याण लोकसभा मतदारसंघ अंतर्गत सर्व ६ विधानसभा मतदारसंघ निहाय करण्यात आली होती. यावेळी २४ कल्याण लोकसभा मतदारसंघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी सुषमा सातपुते यांच्यासह इतर अधिकारी, कर्मचाऱ्यांनी टपाली मतदान करुन आपला मतदानाचा हक्क बजावला.**

निवडणुकीच्या कामासाठी कर्तव्यावर असलेल्या व सध्या नेमणूक असलेल्या क्षेत्राबाहेर राहणाऱ्या अत्यावश्यक सेवेतील तसेच निवडणूक कर्तव्यावरील अधिकारी,कर्मचारी यांनी टपाली मतदान केले. यावेळी जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी अशोक शिनगारे उपस्थित होते. २४ कल्याण लोकसभा मतदारसंघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी सुषमा सातपुते यांनी डोंबिवली येथील सावित्रीबाई फुले कलामंदिर येथे तर १४३- डोंबिवली सहायक निवडणूक निर्णय अधिकारी वैशाली परदेशी यांनी कल्याण येथील विष्णुदास भावे कलामंदिर येथे टपाली मतदान केले. तर १४४-कल्याण ग्रामीण विधानसभा मतदार संघाचे सहा. निवडणूक निर्णय अधिकारी विश्वास गुजर यांनी



देखील टपाली मतदान केले.
त्याचप्रमाणे शासकीय अधिकाऱ्यांबरोबरच निवडणूक कर्तव्यावरील आणि २४ कल्याण लोकसभा मतदारसंघ क्षेत्राबाहेर मतदार असलेल्या ५६४ अधिकारी/ कर्मचारी वर्गाने टपाली मतदानाद्वारे (postal ballate) आपल्या मतदानाचा हक्क काल बजावला.
अत्यावश्यक सेवेत असलेल्या, २४-कल्याण लोकसभा मतदार संघातील नोंदणीकृत मतदार-पोलीस दलातील अधिकारी/कर्मचारी, अग्निशमन दल, वैदयकीय सेवेतील कर्मचारी यांच्यापैकी ज्यांनी विहित मुदतीत टपाली मतपत्रिकेसाठी नमुना १२ /१२ ड व EDC कार्यप्रमाण पत्राकरीता नमुना १२ अ मध्ये अर्ज केला होता व जे कर्मचारी तपासणीअंती पात्र ठरले आहेत अशा १२ अ च्या पात्र कर्मचाऱ्यांना EDC प्रमाणपत्र वितरण करणे, तसेच नमुना १२ / नमुना १२ ड भरलेल्या आणि पात्र ठरलेल्या मतदारांना टपाली मतपत्रिका वितरीत करून, टपाली मतपत्रिकांच्या मतदानाकरीता निवडणूक निर्णय अधिकारी, २४- कल्याण लोकसभा मतदार संघ यांच्या स्तरावर सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती. त्यानुसार या अधिकारी, कर्मचाऱ्यांनी मतदान केले. २४ कल्याण लोकसभा मतदारसंघ परिक्षेत्राबाहेरील निवडणूक कर्तव्यावरील अधिकारी/ कर्मचाऱ्यांसाठी ही सुविधा दि १७ मे व १८ मे २०२४ रोजी देखील उपलब्ध राहणार आहे.

'महाराष्ट्र सम्राट' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक चंद्रकांत शंकरराव भोईटे यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नंबर - डब्लू २३० टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरिया, कोपर खैरणे, एम.आय.डी.सी., ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई - ४००७१० येथे छापून ३०२, हार्मोनी टॉवर, भारत ज्वेलर्स समोर, नेताजी सुभाष चंद्र रोड, कोर्ट नाका, ठाणे पश्चिम - ४००६०१ (महाराष्ट्र ) येथे प्रकाशित केले. संपादक - चंद्रकांत शंकरराव भोईटे ■ RNI - MAHMAR/2012/44140 ■ मो. नं. : +९१-९१६७९५७७७१